विषय कादंबरी
क्र. ३९५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय	कादंबरी
लेखक	हरिश्चंद्र धा. घाणेकर
सन	१८८७
ग्रंथालय क्रमांक	५१३६
पुस्तकाचें नांव	सावकार पुत्र वसंत भानु

१३८.

कादं

१८८७ संग

१७१ - १८८७

२७ - १३८

A. F KLLHA
BIDEI
HANA

श्री

"सावकारपुत्र वसंतभानु"

(कल्पित कादंबरी.)

हें

पुस्तक शुल्हौसी जनांच्या मनरंजना

करितां.

हरिश्चंद्र बाळकृष्ण घाणेकर.

यानीं तयार करून

तें

मुंबईंत

माजगांव प्रिंटिंग प्रेसांत छापिलें.

सन १८६७ च्या पंचविसाव्या आक्टाप्रमाणें हक्क

नोंदिला आहे.

१८८७.

किंमत आठ आणे.

हें पुस्तक क्षात्रैक्यसमाज विराजित सोमवंशी
क्षत्रिय स्वज्ञाति-बंधुजनांस यांच्यातील
विद्योत्तेजन, स्वज्ञाति-समाज
सुधारणेच्छा, ऐक्य-वर्धन,
इत्यादि गुण पाहून
ग्रंथकर्त्यानें अति
नम्रतेनें अर्पण
केलें
असे.

ग्रं. क.

प्रस्तावना.

अलीकडेस आमचे दयाळू इंग्रज सरकारचे राज्यामा-
त मराठी भाषा बरीच उर्जित दशेस येऊन तींत गद्य-
पद्यात्मक नाटकें, सुभाषितें, व कादंबऱ्या वगैरे नाना त-
ऱ्हेचीं पुष्कळ पुस्तकें निघू लागलीं आहेत. त्याच निय-
मास अनुसरून मा शक्त्यनुसार हें मनःकल्पित लहानसें
पुस्तक तयार केलें आहे. हें पुस्तक सर्वांशीं निर्दोष अ-
सेल असें नाहीं. परंतु सुरसिक विद्वज्जनांनीं ह्यांतील
दोषांकडेस लक्ष न देतां हंसक्षीर न्यायानें गुण मात्र ग्रहण
करावे अशी ग्रंथकर्त्याची त्यांस विनयपूर्वक प्रार्थना आहे.
रा० रा० नानाभाई मोरोबा वासलेकर मुंबई हायकोर्टांतील
लिथोनोटरीचे आफिसाचे समनींग क्लार्क व रा० रा० जना-
र्दन राघोबा, क्षात्रैक्यसभाजीचे अध्यक्ष, आणि त्याचप्रमाणें
माझे इतर मित्र ह्यांनीं ह्या पुस्तकास आश्रय मिळविण्याचें
कामांत बरीच मदत केल्याकारणानें ग्रंथ कर्ता त्यांचा फार
फार आभारी आहे.

पेल १ ली सप्टेंबर सन १८८७ } ह. बा. घ.
ग्रं. क.

क्रा. ७८

श्री

' सावकारपुत्र वसंतभानु "

(कल्पित कादंबरी)

मंगलाचरण.

श्लोक (शिखरिणी)

गणेशा विघ्नेशा सकळ गुणधी शंभुतनया ॥
महेशा हेरंबा अमरवरदा पाव सदया ॥
हरीं विघ्नें देवा सकळ मम जीं फार असती ॥
हरिश्चंद्रा बाळा मज वरद हो देइ सुमती ॥ १ ॥

सायंकाळच्या समयीं दिनकर अस्तास जात आहे; पक्षीगण किलबिल किलबिल शब्द करून आपणांस दिवस चांगला गेला ह्यास्तव जणुकाय परमेश्वराचे आभार दर्शवित विश्रांति घेण्यासाठीं आपापल्या घरट्यांकडेस जात आहेत; सुंदर पुष्पवाटिकांमध्यें मोगरा, जाई, जुई, चंपक इत्यादि सुवासिक फुलझाडें नवीन यौवनास आलेल्या यु[illegible] पुष्पभारानें नम्र होत्सातीं मानिनी ह्यांस एक [illegible]त्वाचें जणुकाय [illegible] उदाहरणच दाखवीत आहेत; [illegible] उषा सूर्योदय समयीं सूर्यनारायणानें [illegible] [illegible] केलें एतदर्थ आनंद [illegible] [illegible] त्यास आपला [illegible] [illegible] अस्ताला जात आहे

असे पाहून म्लानमुख होत्सात्या अधोवदन झाल्या आहेत; अत्यंत कामिक जन जसे कामास अति सक्त होतात तद्वत्‌च कमलांतील मधुपानाच्या ठायीं अति लुब्ध झालेले असे भ्रमर कमलमुखें आकुंचित होतांच बंदिवान होऊन कमलांमध्यें कोंडले जात आहेत; सायंकाळचा सुगंधयुक्त मंद व शीतळ वायु वाहत आहे; शेतकरी, मजूर, कोष्टी, व्यापारी, इत्यादि लोक आपापले रोजगार करून झालेल्या श्रमपरिहारार्थ विश्रांति घेण्याच्या पूर्ण हेतूनें आपापल्या घरांकडेस परत जात आहेत; चौर्यकर्मादि अति निंद्य कृत्यें करणारे लोक आपली उद्योगवेळा समीप आलीसें पाहून व आपला अरि रवि अस्तास जात आहेसें पाहून आनंदित होत्साते हळू हळू गिरिकंदरादि गुप्तस्थानांतून आपापल्या उद्योगास बाहेर पडत आहेत; हस्तिनी, पद्मिणी, चित्रिणी इ० जातजातीच्या स्त्रिया कांहीं नूतन यौवन भरांत आलेल्या व कांहीं प्रौढा अशांचे थवे पोथीपुराणश्रवण व देवदर्शन इ० धर्मकर्में आटोपून आपापल्या बिऱ्हाडीं जात आहेत; तद्वतच कांहीं भोळे भाविक पुरुषही आपापलीं सायंकाळचीं संध्यादि कर्में आटोपून देवदर्शन घेत आहेत; सन्यासी, गोसांवी इ० लोक आपल्या देहाचें सार्थक व्हावें ह्या हेतूनें सायंकाळचीं संध्या, देवपूजा, इ० कर्में आटोपून ईश्वराचें स्वरूप ध्यानांत आणून, डोळे मिटून परमेश्वराचे स्तवनांत निमग्न होत्साते ध्यानस्थ बसले आहेत; लांबलांबच्या खेड्या पाड्यांतील गरीब-गुरीब लोक जे बहुत द्रव्य प्राप्त व्हावें ह्या आशेनें फळफळावळ, भाजीपाला, इ० पदार्थ शहरांत उदयीक विक्रय करण्यासाटीं आदले दिवशींच घेऊन

१०८९

आले होते ते तत्क्षणींच त्यांची आशा पूर्ण झाल्याच्या योगें मनांत हर्ष मानीत परत खेड्यांकडे जात आहेत; भाग्यशाली श्रीमंत लोकांच्या मोठमोठ्या विस्तीर्ण बागांत आम्रवृक्ष, पेरू, कर्दळी, पोफळी, नारळी, फणस, जंबू, अंजीर, डाळिंब, पपनस, इ० फळझाडें आपापल्या फळभारें करून अत्यंत लादून ज्याप्रमाणे एखादा अति विद्वान आपल्या विद्याभारानें लादला जाऊन तज्जनित विनयानें अत्यंत नम्र झालेला असतो, तशीं नम्र होत्सातीं त्यांचा उपभोग घेण्यास पात्र असे जे भाग्यशाली ईश्वरानें निर्माण केलेले प्राणी त्यांस आपणांजवळ असलेला अति मधुर व आल्हादकारक असा फलसंचय बक्षिस देण्यास जणूकाय तयार आहेत; त्याच फळझाडांमधून जाई, जुई मोगरा, इ० फुलझाडांचे ताटवे जागजागीं सुवासिक अशा पुष्पांनीं सुशोभित दिसत आहेत, व त्यांजपासून उत्पन्न होणाऱ्या सुगंधानें त्या बागांच्या आसमंतांतील प्रदेश दणाणून गेला आहे; त्या फुलझाडांजवळूनच पाट बांधून जागजागीं आळ्यांतून पाणी लावलें होतें सबब त्या पाण्यांतील सुगंधित फुलांचा मिश्र झालेला वाहणारा मकरंद भक्षण करण्याकरितां उदरंभर भ्रमरांच्या पंक्तीच्या पंक्ति पाण्यावर तरंगत आहेत; तद्वतच फळफळावळ इ० आहार यथेच्छ मिळत असल्याकारणानें तेथें अनुदिनीं वसणार कोकिळ, शुक, सारिका, इ० पक्ष्यांचे थव्यांचे थवे यथेच्छ फळें भक्षण करून आनंदभरीत होत्साते मधुर मधुर शब्द करित, ह्या झाडावरून त्या झाडावर जाऊन, व बागेंतील मनोहर उडणाऱ्या कारंज्यांतील शीतळ व सुगंधित उदकांत यथेच्छ विहार करून अत्यंत संतुष्ट होत्साते सर्व दिवस आनंदांत घालवून विश्रांतिस्तव

आपापल्या घरट्यांकडेस जात आहेत; विरही जन आपला शत्रु चंद्र हा उदयास येऊन आपणांस छळील ह्या भीतीनें ग्रस्त झाले आहेत; विलासीजन आपली विलासवेळा नजीक आल्या कारणानें हर्ष-भरांत निमग्न आहेत; छानछोकी श्रीमंत लोक आपापल्या ऐपतीप्रमाणें उत्तम पोशाख करून कोणी गाडींतून कोणी घोड्यावर बसून, व कोणी पायांनींच सहल करावयास निघाले आहेत, कोणी बेलबागेकडेस जाताहेत, कोणी तुळशीबागेकडेस जाताहेत, कोणी पर्वतीनामक टेंकडीवर उंच स्थानीं जाऊन तेथून सर्व शहराचा चमत्कारिक दिसणारा देखावा पहाताहेत; अशा प्रकारें जिकडे तिकडे गजबजीत व मनोहर दिसणाऱ्या **पुण्यग्राम** नामक नगरामध्यें एके दिवशीं वर सांगिल्याप्रमाणें आल्हाद व तोषदायक सायंकाळसमयीं कोणी एक गृहस्थ सहज इकडे तिकडे हवा घेण्याच्या हेतूनें सहल करीत चालला होता. त्याचें वय सुमारें पंचवीस वर्षांचें असून तो भरज्वानींत होता, व त्याचे शरीराची कांति गौर होती. त्यानें शुभ्र बारीक जरीकांठी धोतर परिधान केलें होतें, व आंगांत भरजरी किनखाबी आंगरखा, आणि डोकींत उत्तम लफ्फेदार जराचें किरमिजी रंगाचें पैठणी पागोटें डाव्या कानावर मोठ्या ऐटीनें झोंकून दिलें होतें, पायांत कांठांस सोनेरी कलाबतु भरलेला मऊ लाल रंगाचा जोडा घातला होता, उजव्या कानांत हिरव्या पाचूचं बाळी होती, व तिचे हिरवेगार किरण लाली आलेल्या भरदार गालांवर पडून त्याच्या मुखकमळास अत्यंत शोभा आली होती, त्याचप्रमाणें गळ्यांत मौक्तिकहार, होता, हस्तांगु[illegible] ठायीं शुभ्र हिरेजडित सुवर्णमुद्रिका असून

हातांत शुभ्र रंगाचा रुमाल धारण केला होता, त्याच्या उंची पोशाख, अलंकार व त्याचप्रमाणें इतर सभ्य चिन्हांनीं तो कुलीन व श्रीमंत असावा असें स्पष्ट दिसत असे.

तो फिरत फिरत त्या शहरांतील बेलबागेंत गेला. ह्या बागेंत लक्ष्मीकांताचें चौकोनी मंदिर होतें, व आंत लक्ष्मीकांताची सुरेख मूर्ती होती. समोर मोठें चौरस आंगण होतें. त्यांत थेट आंतील मूर्तीसमोर एक लहानसें कारंजें होतें, व तें नेहमीं थुई थुई उडत असे. त्याचप्रमाणें त्या बागेंत देवळासभोंवती मनोहर लहानसा एक बगिचा केला होता. त्यांत पपनस, जांब, द्राक्ष इ० फळझाडें व इतर सुंदर पुष्पवृक्षही होते, व बगीचांत वृक्षछायेखालीं बाहेरून आलेल्या मनुष्यांस देवदर्शनानंतर वाटल्यास विश्रांति घेण्यास बसण्यासाठीं लहान दगडी चौथरे केले होते. वरील तरुण गृहस्थ ह्यांपैकीं एका चौथऱ्यावर येऊन बसला आहे इतक्यांत कांहीं अंतरावर मनुष्यांची बरीच गर्दी जमली आहे असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां तो अमळसा पुढें गेला तों तेथें वयानें सुमारें सोळांच्या अमलांत असा एक फक्कड गवयी हस्ताचे ठायीं सारंगी धारण करून मोठ्या कुशलतेनें अलाप काढून लक्ष्मीकांतासमोर सुस्वर गायन करीत आहे असें त्यानें पाहिलें.

त्या गवयानें डोकीस भरजरी मंदील बांधिला होता, व कपाळीं चांदणीप्रमाणें केशरी गंधाचा टिळक लाविला होता; त्यानें आंगांत भरजरी आंगरखा घातला असून त्याजवरून आपली सिंहासही लाजविणारी अशी बारीक कमर जरीकांठी शुभ्र [illegible] त्यानें

मजबूत बांधिली होती; कमरेस रेशमी पिरोजी रंगाचा रुमाल खोंवला होता, व हिरव्या गार रंगाची वरून जरा बुट्टे असलेली इजार नेसला असून पायांत रेशमी कापडाच्यावर जरीचा कशिदा काढलेल्या अशा जांभळ्य रंगाच्या सपाता घातल्या होत्या; आणि करांगुलाच्या ठायीं हिऱ्याचें उत्तम कोंदणकाम केलेली अशी सुवर्णमुद्रिका परिधान केली होती. त्याच्या एकंदर कांतीचा वर्ण पिवळ्या चंपककळीप्रमाणें असून मधून मधून टवटवीत लाल रंगाची छाया मारीत असे. भरदार गालांवर टवटवीत लाली आल्याकारणानें मुखकमळ फारच शोभायमान दिसत असे, डोळे हरिणाप्रमाणें पाणीदार दिसत असू त्याच्या धन्वाकार भृकुटि सरळ नासिकाच्या योगेंकरून जणु काय बाणानें नेहमीं सज्ज अशा दिसत होत्या. तो गवयी ऐन ज्वानीच्या भरांत असल्या कारणानें त्याची छाती भरींव असून अमळ पुढें आलेली दिसत होती.

त्या गवयाचें वरप्रमाणें असलेलें सुस्वरूप व त्यानें परिधान केलेला सुंदर पेहराव पाहून तो तरुण गृहस्थ मोहित झाला. व तो जात्या गायनकलेंत बराच प्रवीण असू नेहमीं गाण्याचा व श्रवणाचा फारच नाद असल्याकारणानें त्या गवयाचे सुस्वर गायनाचे दोन मधुर मधुर चुटके ऐकावे अशा हेतूनें त्याजपासून सुमारें पांच दहा हातांचे अंतरावर एका दगडी चवथऱ्यावर स्वस्थ बसला आहे, तों त्या गृहस्थाची व त्या गुणी गवयाची नजरानजर होऊन त्या गवयानें आपल्या हरिणाप्रमाणें पाणीदार डोळ्यांनीं चंचळ अशा वक्रदृष्टीनें त्याजकडेस अवलोकन करून गालच्यागालीं हांसून मोठ्या ऐटबाजीनें परंतु अ

नम्रत्वानें त्यास मुजरा केला. त्या गृहस्थानेंही त्या गवयास बसलेल्या ठिकाणाहूनच मोठ्या सभ्यतेनें परत मुजरा केला; परंतु हा गवयी कधींही आपल्या पहाण्यांतला नसून इतक्या अदबीनें, पूज्य बुद्धीनें, व खऱ्या प्रेमभावानें सलाम करीत आहे, असें पाहून तो गृहस्थ मनांत विस्मित हो-त्साता पुनः पुन्हा त्या गवयाकडेस न्याहाळून पाहूं लागला.

त्या गृहस्थाच्या एकाएकीं बदललेल्या चकित व विचार-युक्त अशा चर्येवरून त्या गवयानें तर्क केला कीं, ह्या गृहस्थानें आपणास पुरतें ओळखलें नाहीं. नंतर त्यानें आणखी एक दोन गाण्याच्या चिजा ह्मणून गायन बंद केलें, व तन्निमित्यें झालेल्या श्रमपरिहारार्थ आपले कोमल व ना-जूक मुखकमलावर आलेले मौक्तिकमय घर्मबिंदु आपल्या कमरेस असलेल्या रुमालानें पुसून विश्रांति घेत बसला. गायन बंद झाल्याकारणानें त्याजसभोंवती मिळालेली गर्दी हळू हळू कमी होत गेली, व कांहीं वेळानें त्या जागीं फक्त तो गृहस्थ व तो गवयी असे दोघेच राहिले. आतां इक-डेस आपणां दोघांशिवाय तिसरें कोणीच नाहीं असें त्या गवयानें पाहून तो आपल्या जागेवरून उठला व त्या गृहस्थासन्निध येऊन पूर्वीप्रमाणेंच मोठ्या अदबीनें त्यानें त्यास पुन्हा मुजरा केला. हें पाहून त्या गृहस्थानें त्या गवयास मोठ्या सन्मानानें आपल्या शेजारीं बसावयास सांगितलें. व दोघांचें संभाषण सुरू झालें.

प्रिय वाचक हो, त्या गृहस्थाचें पुढें त्या बेलबागेंत-ल्या गवयाबरोबर काय संभाषण झालें हें ऐकण्यास आपलीं मनें फारच उत्सुक झालीं असतील ह्यांत संशय नाहीं.

परंतु तूर्त त्यांस एकटेंच ठेवूं, व तो गृहस्थ व तो गवयी हे कोण होते, ह्याजविषयीं प्रथमतः विचार करूं.

भाग दुसरा

पुण्यग्राम नगरामध्यें लक्ष्मीदास नामक एक सधन सावकार रहात असे. त्याचे स्त्रीचें नांव गांधारी असें होतें. तीं उभयतां पति=पत्नि सुस्वाभाविक असून इतर गुणांनींही संपन्न होतीं. लक्ष्मीदास ह्याची त्याच्या नांवाप्रमाणें तेथील महा धनाढ्य सावकारांत गणना होत असे. तो मोठा धार्मिक व स्वभावानें उदार होता. गांधारीही गृहकृत्यांत कुशल होती, व ती स्वभावानें फार सुशील, शांत व मनमिळाऊ असल्या कारणानें तीं उभयतां नेहमीं आनंदी असत. दैवप्रसादें त्यांस एक पुत्ररत्न प्राप्त झालेंच होतें. ह्या प्रमाणें त्यांचा संसार संपत्ति व संतति संपन्न असून मोठा सुखाचा होता. त्या पुत्राचा जन्म सोमवारीं झाला होता. ह्मणून त्याचे नांवापूर्वी चंद्र हीं अक्षरें घेऊन त्याची मुद्रा नेहमीं हास्यवदन असे ह्मणून चंद्र ह्यास हास्य हीं अक्षरें जु- ळून चंद्रहास्य असें त्याचें नांव ठेविलें. आणि तो आपल्या नांवाप्रमाणेंच चंद्रवत सुस्वरूप व तेजस्वी होता. तो चंद्र- हास्य पुढें शुक्लपक्षांतील शशी जसा प्रतिपदेपासून पौर्णिमे पर्यंत कळाकळांनीं वाढत जातो, तसा जसे जसे दिवस, ऋतु, मास, वर्षें भरत चाललीं तसतसा वाढत जाऊन विशे- षच रूपवान व बुद्धिवान दिसूं लागला. तो वयांत आ- ल्यावर त्याच्या बापानें त्यास विद्याभ्यासाचें वगैरे उत्तम शि- क्षण [illegible]ले. व त्याचप्रमाणें पुढें त्यास आपले व्यापार धंद्यांत-

ही आपणाबरोबर वहिवाटून बरेंच हुशार केलें. तेणेंकरून कांहीं काळानें चंद्रहास्य हा आपल्या बापास व्यापार धंद्यांत बरीच मदत करूं लागला.

इतक्यांत चंद्रहास्यास विसावें वर्ष लागून तो भरज्वानींत आल्या कारणानें त्याजवर तारूण्याची पूर्ण छाया पडूं लागली. तेव्हां ह्याचे पित्यास त्याचे विवाहाविषयीं काळजी लागली; कारण, आपण ह्या वयांत ह्याचा विवाह करून न दिल्यास कदाचित् ह्याचें पाऊल कुमार्गीं पडून ह्यास भलताच छंद लागेल व मुलगा दुर्गुणी निघेल, व आपली सर्व संपत्ति आपले पश्चात् ह्याचे हातीं येणें आहे, ती सर्व दुर्व्यसनांत उधळून हा भिकारी होईल, व आपल्या अब्रूस धक्का आणील, व जनांत आपला उपहास होईल. ह्यास्तव चंद्रहास्याचा लवकरच विवाह केला तर बरें, असा विचार करून त्यानें आपली पत्नि गांधारी हिजजवळ आपले मनांत घोळत असलेली मुलाचे लग्नाविषयींची गोष्ट काढून त्याजवर तिचा काय अभिप्राय आहे तो पहावा ह्या हेतूनें तिजजवळ आपला मनोदय प्रगट केला. गांधारीही नेहमीं पतिवचनास प्रिय मानीत असे. तिनें आपले प्रिय पतीचे विचारास लागलाच रूकार दिला. आपल्या मताप्रमाणेंच आपल्या प्रिय पत्नीचा विचार आहे हें पाहून लक्ष्मीदासास फार समाधान वाटलें. नंतर त्यानें एके दिवशीं आपले प्रियकर मुलास एकांतीं बोलावून त्याचा विवाह करण्याविषयींचा आपला विचार त्याजपुढें प्रगट केला.

चंद्रहास्य हा जात्या सूज्ञ व विचारी असून नेहमीं आपल्या प्रिय मातापित्याचे आज्ञेंत वचनांत वागणारा असे. त्यानें आपल्या पित्याचें भाषण मोठ्या गांभिर्यानें ऐकून

घेऊन त्यास अति नम्रतेनें उत्तर दिलें कीं, आपण पो
असून माझे सर्वस्वी हितचिंतक अहांत. तस्मात् मी आ
पल्या मर्जी विरुद्ध कांहीं नाहीं. आपण जें कांहीं कराल
ह्या सेवकास मान्य आहे. आपल्या मुलाचें असें मधुर भा
षण ऐकून लक्ष्मीदासास परम आनंद झाला; व ईश्वरा
आपणास असा सुपुत्र दिला ह्मणून त्यानें त्याचे फार
आभार मानून प्रार्थनापूर्वक स्तवन केलें. नंतर त्यानें त्या
शहरांतील रामदयाळ नामक एका श्रीमंत सावकाराची
हेमवल्लया नामक अति रूपवान, सुशील व गुणी कन्या
आपले मुलास वधू योजून तिजबरोबर मोठ्या डामडौला
चंद्रहास्याचें लग्न केलें.

चंद्रहास्याचा विवाह होऊन त्यानें आपल्या पत्निबरो
कांहीं वर्षे आनंदांत घालविलीं नाहींत तोंच त्याच्या पि
त्यानें संसार माळा त्याचे गळ्यांत घालून आपण कैलासाप्र
गमन केलें. प्रिय वाचक हो, असें झाल्या कारणानें त
बिचाऱ्या चंद्रहास्यावर तर दुःखाचा डोंगरच कोसळला
त्याची आई गांधारी हिचे दुःखास तर पारावारच नाहीं
तिनें जो शोक केला तो लिहूं गेलें असतां एक मोठ
ग्रंथच होईल. हेमवल्लयाहि आपल्या श्वशूराचें वियोगजन्य
दुःख न साहून शोकग्रस्त झाली. आपल्या दुर्दैवानें आप
णावर एकाएकीं इतका बिकट प्रसंग आणिला ह्मणू
प्रथमतः चंद्रहास्य फारच भिऊन जाऊन त्याचे छाती
धक्का बसला, परंतु तो शहाणा व विचारशील असल्या
कारणानें त्यानें धैर्य धरून आपला शोक आंवरला, व प्रथ
आपल्या शोकग्रस्त झालेल्या मातोश्रीची मोठ्या शांतप
समजूत केली, व नंतर आपल्या कैलासवासी पित्याचें

यथाविधि क्रियाकर्म इ० आटोपून आपण जातिनिशीं आपल्या बापाचा धंदा-रोजगार चालवूं लागला.

चंद्रहास्य स्वतः लहानपणापासून आपल्या पित्याबरोबर वापरून व्यापारांत बराच निष्णात झाला होता ह्मणून त्यानें थोडक्याच दिवसांत आपले पित्याप्रमाणें अब्रु कमावून बापानें ठेवलेल्या द्रव्यांत आणखी बरीच भर केली. पुढें वाढतां वाढतां त्याची कीर्ति व लौकिक इतका वाढला कीं त्यास तेथील राजवाड्यांत बराच मान मिळूं लागला. ह्या प्रमाणें व्यापार-धंद्यांत त्याचें चित्त आकर्षण झाल्यामुळें व वाढत चाललेल्या लौकिकाच्या आनंदामुळें त्यास आपले पितृवियोगजन्य दुःखाचा थोड थोडा विसर पडत गेला, व तो आपली पत्नि हेमवल्लया हिजबरोबर आपले दिवस सुखानें घालवूं लागला. असें बरींच वर्षें चाललें होतें.

पुढें कोणे एके दिवशीं कांहीं नाजूक कामाकरितां चंद्रहास्य ह्यास अवेळींच आपले प्रिय पत्नीची भेट घेणें जरूर पडलें. तेव्हां तो स्त्रीचे महालीं गेला असतां, त्यानें आपली प्रिय पत्नि हेमवल्लया गालावर एक हस्त टेवून चिंतातुर होत्साती आपलें मुख म्लान करून बसलेली राहिली. हें पाहून चंद्रहास्य फारच भयचकित झाला व तिनें आपणास पहावें ह्मणून तो अगदीं जवळ गेला. तरी ती देहभानावर नसून आपलेच विचारांत गुंग होऊन बसून राहिली होती. चंद्रहास्य कांहीं वेळपर्यंत ही कसल्या विचारांत आहे हें पहावें ह्मणून तसाच तेथें उभा राहिला. तों हेमवल्लयेची विचारनिमग्नता कमी होऊन दृष्टि त्याजकडेस गेली, व ती सलज्ज होत्साती आपला पदर सांवरून झटकन उठली व एके बाजूस उभी राहिली.

चंद्रहास्य—प्रिये, आज नित्यशः प्रमाणें तुझी वृत्ति आनंदयुक्त नसून तुझें मुखकमल कोमेजलेलें व निस्तेज दिसत आहे. ह्याचें कारण काय असावें बरें ? मला वाटतें आज तुझी प्रकृति नादुरुस्त असावी, अथवा पदरच्या कोणी सेवकानें तुझा अपमान केला असावा. काय असेल तें मनांत शंका न धरितां त्वरित कथन कर. मी त्याचा लागलाच बंदोबस्त करितों. आज ईश्वराचे कृपेनें आपणास सर्व वस्तु अनुकूल असतां तुला तर काय परंतु तुझे केंसासही धक्का लावणारा असा कोण आहे ?

हेमवल्लया—प्रिय पतिराज, आपणासारख्यांची पूर्ण प्रेमदृष्टि ह्या दासीवर असतां तिचे जिवास यत्किंचितही त्रास देणारा असा प्राणी असणार तो कोठून ?

चंद्रहास्य—प्राण प्रिये, तुला होणारें दुःख तूं मजपासून लपविण्याचा कितीही प्रयत्न केलास तरी तो सर्व व्यर्थ होय. कारण तुझी सुंदर मुखश्री म्लान झाली आहे, चित्त स्थिर नाहीं, देहभान नाहीं, व एकंदर तुझी वृत्ति उदासीन व त्रासित दिसते; ह्या सर्व बाह्यचिन्हांनीं त्द्द्गत दुःख न सांगता व्यक्त होत आहे. तेव्हां मनांतील गोष्ट मनांत गुप्त ठेवून आपले शरीररूपगृहास दुःखरूप अग्नीनें व्यर्थ पीडित करणें हें तुजसारख्या सुज्ञेस योग्य नाहीं.

हेमवल्लया—आमचं मेलं चाललंच आहे नेहमीं. आतां त्यांत आपण विचारपूस करून मज हतभागिनीबरोबर व्यर्थ दुःखाचे वांटेकरी तें कशास व्हावयाचं ?

चंद्रहास्य—प्रिये, तुझें व माझें दुःख काय भिन्न आहे ? ज्या दिवशीं मीं तुझें पाणिग्रहण केलें त्याच दिवसापासून आपण, एकमेकाचे सुख दुःखाचीं वांटेकरी झालों आहोंत

ह्याजकरितां एक वेळ मनांत किंतु न आणितां कसें सांग पाहूं लवकर तुझ्या दुःखास काय कारण झालें तें ? ह्मणजे तन्निवारणार्थ त्वरित उपाय योजितां येईल. रोग समजल्याशिवाय औषधाची योजना करितां येत नाहीं.

हेमवल्लया—पुरे झालं बाई. पण तें न विचारल्यानं नाहीं का चालत?

चंद्रहास्य—प्रिये, ज्या कारणानें तुझ्या कोमल आत्म्यास दुःख होत आहे, तें कारण मला कळल्याशिवाय मनास समाधान न वाटून व्यापार—धंद्यांत माझें चित्त बरोबर लागणार नाहीं; ह्याजकरितां पुन्हा एकवेळ तुझ्या त्रासलेल्या आत्म्यास तसदी देऊन मघां विचारलेलें कारण मजला कथन करण्याविषयीं मी आग्रह करितों. आतां तरी कृपादृष्टि होईल काय?

हेमवल्लया—आतां तर कमालच झाली बाई. प्राणनाथ, एखाद्या मनुष्यास हरभऱ्याच्या झाडावर चढवून त्याजपासून एखादी गोष्ट काढून घेण्याची युक्ति आपणांस किती तरी उत्तम साधली आहे!

चंद्रहास्य—प्रिये, वः बोलतां बोलतां एखादी गोष्ट आकाशपंथानें उडवून नेण्याचे कामांत तूं फारच निष्णात आहेस.

हेमवल्लया—(हास्यवदन करून)—जळलं मेलं. अखेर सर्व गोष्टीचा पगडा माझेच शिरावर ना ? प्राणनाथ, आपणांस इतकं कुशलतेचं बोलणं बोलावयास शिकविणारे गुरुजी तरी कोण असावे? शाबास त्यांचे विद्वत्तेची. बरं तें असो. पण आतां ज्या अर्थी आपला आग्रहच आहे त्या अर्थी जिच्या योगें आज अंतःकरणांत खिन्नता उत्पन्न

झाली आहे ती गोष्ट सांगतें, त्याजकडेस लक्ष असावं.

चंद्रहास्य—प्राणप्रिये, लवकर सांग पाहूं, मी तें एका चित्तेंकरून श्रवण करितों.

हेमवल्लया—प्राणनाथ, कालचे दिवशीं कालकर्मणुके स्तव आपल्या पुस्तकालयांतील गुरुचरित्राचा ग्रंथ काढून मं वाचीत होतें तों त्यांत एके ठिकाणीं असा लेख आढळल कीं निपुत्रिकास इहलोकीं व परलोकीं सद्गति नाहीं. प्रिय पतिराज, फार काय सांगूं? त्यांत मीं असं वाचलं कीं, नि पुत्रिकाचं तोंड पाहिलें असतां पातक आहे. [असें ह्मणून डोळ्यांतून ढळढळां अश्रुपात काढून स्फुंदस्फुंदून रडूं लागते.

चंद्रहास्य[हेमवल्लयेस पोटाशीं धरून]—प्रिये, हें का बरें वेडीप्रमाणें. एखादे गोष्टीचा उगाच खेद करून रड बसल्यानें कांहीं एक लाभ न होतां उलट शरीरास इजा मा होणार. तशांत आधीं मुळचेंच शरीर नाजूक. मग रोगा स घर घेण्यास वेळ का लागणार आहे ?

हेमवल्लया [रडण्याचे हुंदके देऊन]—प्राणनाथ, आप णांस संतान नाहीं ही गोष्ट मला फार दुःखद वाटते. सं तानाशिवाय जिवंत रहाण्यापेक्षां मरण बरं. मला आज पासून अन्नपाणी अगदीं गोड लागणार नाहीं.

चंद्रहास्य—प्रिये, वेडीसारखें भलतेंच भाषण करून जी गोष्ट मानवाधीन नाहीं, तिजविषयीं उगाच हट्ट घेऊन ब सणें हें तुजसारख्या सूज्ञेस शोभतें तरी का? परमेश्वर ठेवील त्या स्थितींत समाधान मानून रहावें ह्यांत मोठें सुख आहे. [हेमवल्लयेची थट्टा करून] पण प्रिये, अशानें अन्नपा ण्यावांचून राहून तूं लवकरच स्वर्गवासी झाल्यास तुजवर आत्महत्येचें पातक लागणार. त्याचा विचार केलास काय!

हेमवल्लया—प्रिया, कांहीं चिंता नाहीं. परंतु मज हतभागिनीला मरण तरी कोठून येणार आहे, आणि जरी आलं तरी हत्येचे पातकाचा भार त्या परमेश्वराचे डोकीवर. त्यानें मजला संतानाशिवाय कां बरं ठेवावं?

चंद्रहास्य—प्रिये, ही तुझी समजूत अगदींच वेडेपणाची आहे. पहा, ज्याचे त्याचे पूर्वसंचित पुण्याई प्रमाणें ईश्वर त्यास तसतसे स्थितींत ठेवितो. ह्याजकरितां मनुष्यमात्रानें कोणत्याही गोष्टीबद्दल केवळ देवावरच भार न घालितां आपले दैवास बोल लावून ईश्वरानें जी स्थिति दिली आहे, त्यांत तृप्त असावें, हा उत्तम पक्ष.

हेमवल्लया—प्राणनाथ, आपण बोललांत तें अक्षरशः खरं आहे. पण भगवद्भक्तांची आळ श्री भगवान पुरवितो हें तरी खरं ना?

चंद्रहास्य—प्रिये, हें मात्र खरें बोललीस. आणि मघासारखी उतावळि न होतां असाच विचार करून आपली ईश्वराचे ठिकाणीं दृढ भक्ति असल्यास त्यास दया येऊन तो आपले मनोरथ पूर्ण करील, याजविषयीं निःसंशय रहा.

हेमवल्लया—बरं तर बाई, परमेश्वराचे ठिकाणीं माझा भाव दृढ आहे किंवा नाहीं, याचा प्रत्यक्ष अनुभव आतांच ह्या गोष्टीवरून घेतें. ह्मणजे झालं ना? प्राणनाथ, भीष्माचार्यांची प्रतिज्ञा खरी करण्याकरितां श्रीकृष्ण भगवान यांहीं हस्ताचे ठायीं शस्त्र धारण केलं, अर्जुनाचं सारथ्य केलं, द्रौपदीस संकट समयीं वस्त्रें पुरविलीं, व अवेळीं अन्नाचा पुरवठा केला, नृसिंह अवतार धारण करून प्रल्हादाचं संरक्षण केलं, ध्रुवाचा धांवा ऐकून त्यास अढळपदीं जागा दिली, अशीं पुराणांतरीं परमेश्वरप्रसादाचीं अनेक

उदाहरणं आढळतात; ह्यास्तव ह्या दीन झालेल्या अबलेची दया त्या परमात्म्यास येणार नाहीं असं कसं बरं होईल?

चंद्रहास्य—प्रिये, सत्य आहे. व त्याजवर पूर्ण भरंवसा ठेव ह्मणजे झालें. (असें ह्मणून आतां रागाच्या आवेशांत असतां कसेही रीतीनें हिची समजूत नहोतां उगाच एखादें भलतेंच होणार. ह्याजकारितां आतां हिला असेच स्थितींत ठेवून हिचा राग अमळ शांत झाल्यावर हिची समजूत घालणें ठीक आहे. असा मनांत विचार करून चंद्रहास्य आपल्या जोत्याजी नामक विश्वासु नोकरास तिचे पहाऱ्यास ठेवून आपण निघून गेला.)

प्रिय वाचक हो, चंद्रहास्य निघून गेल्यानंतर हेमवल्लया पुन्हा विचारांत गुंग होऊन ज्या गालिचावर बसली होती तेथेंच तीस दुःखनिद्रा आली. निद्रिस्त असतां हेमवल्लयेस एक स्वप्न पडलें त्यांत चतुर्भुज नारायण साक्षात् येऊन तीस दृष्टांत दिला कीं, हल्लीं मृत्युलोकीं तरूणोपायास योग्य असें जें श्रीसत्यनारायणव्रत त्याचें यथासांग आचरण केलें असतां तुझी मनकामना पूर्ण होईल. असें स्वप्न होऊन ती लागलीच जागृत झाली; व तिनें स्वप्नांत पाहिलेलें नारायणाचें रूप ध्यानांत आणून भक्तिभावपूर्वक त्याची स्तुति केली. नंतर ती परम आनंदित होत्साती ही शुभ वार्ता आपले प्रिय पतीस केव्हां सांगेन असें तीस झालें. इतक्यांत कांहीं वेळानें चंद्रहास्य आपलें जरूरीचें कांहीं काम आटोपून आतां आपले प्रियेचा राग कमी पडला असेल असा विचार करून तिचें समाधान करण्याकरितां पुन्हा स्त्रीचे महालीं आला. तेव्हां हेमवल्लया हिची मुद्रा शांत व प्रफुल्लित असून ती अत्यानंदांत आहे असें त्या

पाहिलें. आणि त्यास फारच आश्चर्य व समाधान वाटून त्यानें मनांत ईश्वराचे फार फार आभार मानिले.

हेमवल्लया(चंद्रहास्य आलासें पाहून हास्यवदन करून)—प्राणनाथ, आतां खरं कोण? (असें ह्मणून मोठ्या आनंदानें चंद्रहास्यास आलिंगन करिती झाली.)

चंद्रहास्य—प्राणप्रिये, तुझा चेहरा आनंदयुक्त व मुद्रा हर्षभरित पाहून आतां मला फारच उल्हास वाटत आहे; परंतु तूं बोललीस इतक्यानें माझी समजूत झाली नाहीं. एकदम इतका बदल होण्याचें कारण काय हें जाणण्यास मी फार उत्सुक आहें. तरी घडलेली सर्व हकीकत एक वेळ मला सविस्तर निवेदन करावी.

हेमवल्लया—प्राणनाथ, आपण मघांशीं मजजवळून उठून गेलांत. नंतर मी विचारांत असतांच ह्या गालिचावरच निद्रिस्त झालें. निद्रिस्त असतां चतुर्भुज नारायण माझे स्वप्नांत येऊन मला असं सांगितलं कीं, श्रीसत्यनारायणव्रत आचरण केलं असतां आपली मनकामना सिद्ध होईल. प्रिया, ही आनंदकारक बातमी आपणांस केव्हां एकदां सांगेन असं झालं होत, तों येणं झालं. प्राणप्रिया, आपण आता खरंच सांगा कीं, खरं कोण? व माझी परमेश्वराचे ठायीं श्रद्धा दृढ आहे किंवा कसं!

चंद्रहास्य—प्रिये, धन्य तुह्मा स्त्रियांची. फार काय सांगावें, पार्वतीनें देवाधिदेव शंकर ह्यासही जिंकिलें. मग आह्मा सारख्या पामर नरास त्वां जिंकलें ह्यांत नवल तें कोणतें?

हेमवल्लया—प्राणनाथ, हें काय जळलं भलतंच, उगाच खरं कोण ह्मणून ह्मटलं त्यांत आपणांस जिंकिलं तें कसं? कितीही केलं तरी मी आपली दासीच आहें. असं अ-

असतां मला अजिंक्य ही पदवी कशी बरं शोभेल ? तुह्माला आपलं कुसळाचं मुसळ करून मेली कोणाची तरी थट्टा करावीशी वाटते.

चंद्रहास्य–प्रिये, मी ह्मणालों तें अक्षरशः खरें आहे.

हेमवल्लया–आतां त्रस्त झालं बाई. पण अझून नाहीं कां जळली ती थट्टा पुरी होत? ठेवा ती जळली एके बाजूस घटकाभर. पण प्राणनाथ, आतां पुढें सत्यनारायणाचं व्रत केव्हां करायाचं ?

चंद्रहास्य–प्राणप्रिये, हें काम आपले शास्त्रीबुवावांचून कोणासही उत्तम रीतीनें बजावितां येणार नाहीं.

हेमवल्लया–प्राणनाथ, मग वेळ कशास हवा? शुभस्य शीघ्रं.

चंद्रहास्य–प्रिये, ठीक आहे. मी आतांच मनुष्य पाठवून शास्त्रीबुवांस बोलावून आणवितों. (असें ह्मणून चाकरास हाक मारून ह्मणतो.) कोण आहेरे तिकडे,

जोत्याजी–(आंत येऊन) जी सरकार. मी आपला गुलाम जोत्याजी हजर हाये. काय हुकूम असल तो आवशी खुशिनं डोकशावर घेऊन करीन.

चंद्रहास्य–अरे जोत्याजी, लवकर शास्त्रीबुवांकडेस जाऊन त्यांस आतांच बोलावलें आहे ह्मणून सांग.

हेमवल्लया–अरे जोत्याजी, आह्मी इकडेस त्यांचीच वाट पहात बसलों आहों, असं शास्त्रीबुवांस सांगून त्यांस बरोबर घेऊनच ये बरं?

जोत्याजी–जी बाईसाहीब, लय बिगीनशी त्यांसनी घेऊन मागले पायीं पळत येतुया ना काय?

असें ह्मणून जोत्याजी मोठ्या त्वरेनें निघून शास्त्रीबुवां-

कडेस गेला, व शास्त्रीबुवांस दंडवत करून ह्मणाला कीं, महाराज, सरकारांनीं नी बाईसाहिबांनीं आपणांसनी आक्शी तांतांडिनं बोलावलया. आपलीच वाट बघत ह्या-लामंदी बसल्याती.

शास्त्रीबुवा—अरे जोत्याजी, आज इतकें उतावळीचें अ-वेळींच कोणतें काम असावें बरें?

जोत्याजी—जी, तें मला काइ न्हाई ह्मायिती. पण तुमासनी आक्शी बिगीन बोलावलया. मज संगच घेऊन याया सांगितलया.

शास्त्रीबुवा—बरें आहे. बस अमळ. मी पोशाख करितों. आपण बरोबरच जाऊं. (असें ह्मणून आंत जाऊन आं-गरखा पागोटें घालून जोत्याजीबरोबर मोठ्या लगबगीनें चंद्रहास्याचें, महालीं आले.)

जोत्याजी— (आंत जाऊन) सरकार, शास्त्रीबुवा आल्याती.

चंद्रहास्य—त्यांस आंत घेऊन ये.

जोत्याजी—(शास्त्रीबुवांस घेऊन जाऊन) सरकार, शास्त्रीबुवांसनीं आपल्या समोर आणल्या.

चंद्रहास्य—(शास्त्रीबुवा आलेसें पाहून) नमोनमः यावें शास्त्रीबुवा. (असें ह्मणून शास्त्रीबुवांचा हात धरून, जवळच असलेल्या एका चौरंगावर त्यांस बसावितो. इतक्यांत हेमव-ल्ल्याही येऊन शास्त्रीबुवांचे चरणावर मस्तक ठेवून त्यांस नमस्कार करिते.)

शास्त्रीबुवा—(वर हस्त करून) चंद्रहास्या, आयुष्य-मानभव. हेमवल्ल्ये, अखंड सौभाग्यवती भव. अस्तु. चंद्र-हास्या, आज अवेळींच इतक्या घाईनें कां बरें पाचारण केलें?

चंद्रहास्य–(हेमवल्लयेकडेस बोट दाखवून) तें तिकडेस विचारावें.

शास्त्रीबुवा–हेमवल्लये, इतके घाईचें कोणतें काम आहे, तें त्वरित विदित व्हावें. तें मी यत्किंचितहा आळस न करितां मोठ्या आनंदानें करीन.

हेमवल्लया–शास्त्रीबुवा, तसदीविषयीं क्षमा असावी. (नंतर तिनें शास्त्रीबुवांस झालेला सर्व वृत्तांत निवेदन करून आपला श्रीसत्यनारायणव्रत आचरण करण्याचा बेत त्यांस विदित केला.)

शास्त्रीबुवा–ठीक आहे. उदयिक पौर्णिमा व रविवार आहे. योग उत्तम आहे. ह्याजकरितां उदयीकच बेत व्हावा हें बरें. कसेंकाय?

हेमवल्लया–ठीक आहे शास्त्रीबुवा. मी उदयीक सर्व साहित्याची तयारी करवितें.

शास्त्रीबुवा–(चंद्रहास्याकडेस वळून) चंद्रहास्या, आपणांसही भार्येसह पुजेस बसलें पाहिजे. प्रदोषकाळीं पुजेस बसणें हा उत्तम पक्ष.

चंद्रहास्यव हेमवल्लया–ठीक आहे शास्त्रीबुवा. आह्मी आपल्या इच्छेबाहेर नाहीं.

शास्त्रीबुवा–पण चंद्रहास्या, इतकी मोठी पूजा केल्यासारखें तत्प्रित्यर्थ ब्राह्मणांस भोजन घालणें अवश्य आहे.

चंद्रहास्य–ठीक आहे शहरांतील सर्व ब्राह्मणांस उद्यां आह्माकडेस भोजनास येण्याविषयीं आमंत्रण करावें.

शास्त्रीबुवा–ठीक ठीक. तें मी करितों. आपण कांहीं काळजी करूं नये.

प्रिय वाचकहो, ह्याप्रमाणें भाषण करून. शास्त्रीबुव, स्वगृहीं निघून जाऊन दुसरे दिवसाचे तजविजीस लागले. नंतर दुसरे दिवशीं रीतीप्रमाणें यथासांग पूजा आटोपून सत्यनारायणाची पोथी (कथा) इ० वाचून सर्व मंडळीस प्रसाद वांटला. व ब्राह्मणभोजनही आटोपून याचक जनांस पुष्कळ द्रव्य देऊन तृप्त केलें. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीसत्यनारायणप्रसादेंकरून हेमवल्लुया गार्भिणी होऊन नऊ मास पुरे होतांच सुपुत्ररत्न प्रसवली. एके दासीनें चंद्रहास्यास पुत्ररत्न प्राप्त झाल्याची शुभकारक बातमी सांगितली. चंद्रहास्यानें आनंदित होऊन त्या दासीस मोठें बक्षीस दिलें. नंतर आपल्या धन्यास सुपुत्ररत्न प्राप्त झालें ही बातमी सर्व वाडाभर पसरून जिकडे तिकडे आनंदच आनंद झाला. आनंदकारक वाद्यें वाजूं लागलीं, चंद्रहास्यानें सर्व शहरांत हत्तीवरून साखर वांटली; त्याचप्रमाणें वारांगनांचें नाच करवून शहरांतील मोठमोठे शेटसावकार, मानकरी व सद्गृहस्थ ह्यांस मोठ्या सन्मानानें बास पाचारण केलें त्यांस पानगुलाब, व याचकांस बहुत द्रव्य देऊन तृप्त केलें. तो मुलगा जन्मला ते दिवस वसंतऋतुचे असल्या कारणानें त्याच्या नांवापूर्वीं 'वसंत' हीं अक्षरें घेऊन,त्याचा चेहरा भानुप्रमाणें तेजःपुंज असल्या कारणानें 'भानु' अशीं दोन अक्षरें त्यास जुळून वसंतभानु असें त्याचें नांव ठेविलें. पुढें तो वसंतभानु वाढत जाऊन बुद्धिमतेचीं चिन्हें दाखवूं लागला. तेव्हां चंद्रहास्यास विशेषच आनंद झाला. त्याला आठवें वर्ष लागलें तेव्हां चंद्रहास्यास त्यास जनार्दनपंत ह्मणून एका विद्वान शिक्षकाचे स्वाधीन केलें व त्यास अभिवचन दिलें कीं, आमच्या एकुलत्या

मुलास कोणत्या प्रकारचा दुर्गुण न लागतां उ रीतीनें शिक्षण देऊन त्यास लवकरच विद्येंत निष्ण केले असतां आम्ही तुम्हास मोठें बक्षीस देऊं.

पुढें तो वसंतभानु विद्याभ्यासास लागून थोडकेच वर्षां इतका हुशार झाला कीं त्या शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांमध त्याचा नंबर पहिला लागूं लागला.

त्या शाळेंत त्या शहरांतील कुलीन अशा मोठमोठय घराण्यांतील मुलीही शिकावयास येत असत. त्या वाचन लेखन, गणित, इ० स्त्री जातीस अवश्य तितकें शिक्षण घेत. वसंतभानु त्या शाळेंत असतां ज्या मुली तेथें अभ्यास करण्यास येत असत, त्यांत कमळिणी नामें एक अती रूप-वान सावकार कन्या ही येत असे. तिची बुद्धि फारच तीव्र असून त्या वेळीं तिजबरोबर शिकावयास येणाऱ्या मुलींत तिचाही नंबर पहिला असे.

प्रिय वाचकहो, 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' ह्या म्हणी प्रमाणें तो वसंतभानु व ती कमळिणी ह्यांची एकमेकांवर अत्यंत प्रीति असून त्यांचा बराच स्नेह जडला होता.

भाग तिसरा.

प्रिय वाचकहो, बेलबागेंत एक तरुण गृहस्थ व गवयी हे एकमेकास मुजरा करून शेजारीं बसले हें पहिल्या भागांत सांगितलें आहेच. पुढें त्या गवयाबरोबर त्या गृह-स्थानें खालीं लिहिल्याप्रमाणें संभाषण करण्यास सुरुवा केली.

गृहस्थ—क्यंव गवयीजी, आप कौन मुलखसे आया और ये शहरमे आकर आपकु कित्ते दीन हुवे?

गवयी—जी खाविंद, मेरे मुलखका नाम लखनौ. और
स्वग ।हरमे आकर मुजे दो दीन हुवे.

गृहस्थ—बहोत अच्छा. लेकिन बस्तीका ठिकाना कहां?

गवयी—जी सरकार, अब बस्ती तो धरमसालेमे धरि है. लेकिन अच्छी जगाके वास्ते सरकारकु कुच तलास हुवेसो कह देना.

गृहस्थ—और कोई सात है के अकेले हो?

गवयी—नहीं सरकार. मै तो अकेला हौं.

गृहस्थ—आपकी उमर कित्ती होगी?

गवयी—जी सरकार. सोळ बरसकी.

गृहस्थ—लेकिन आपके गुणकी मै बहोत तारीफ करताहौं.

गवयी(मुजरा करून)-सुनो.खाविंद, हिरेकी पारख जव्हेरी बना नहीं हो जाती. लेकिन मेरेसे बहोत हुशार अदमी दुनियेके बीचमे हो रहे और है. वास्ते सरकारने ये बंदेकी उत्ती तारीफ नहीं करना. बे-अदबीकी माफी मंगता हौं.

गृहस्थ—गवयीजी, इसमें बेअदबी कुच नहीं. लेकिन आपके बातोपरसे मेरे मनमे आप कोई अब्रूवाले और श्री-मंतका लडका हो ऐसा ख्याल आता है. वास्ते आपका शहरमे आनेका सच्चा मतलब और काज कौन ये मै जानना ..ना हौं.

गवयी—खाविंद, आप बहोत जाननेवाले अदमी हो. त., मै मेरे आनेका सच्चा मतलब कह देता हौं, लेकिन उस काममें आप सच्चे दीलसे मेरेकु मदत करनेका बचन देना चाहिये. इत्ती दोनो हात जोडके सरकारके पास बिनाति करता है.

गृहस्थ–गवयिजी, ओ बातसे तुम बेफिकर रहो.

गवयी–सरकार, ये बात सच्ची है. लेकिन बचन मिले बिना मै ये बात कह सकता नहीं.

गृहस्थ–कुच फिकर नहीं. ये लेव बचन. अब और कुच रहा ?

गवयी–सरकार, एक बात कह देता हीं, लेकिन आपकु घुस्सा तो नहीं आवे ?

गृहस्थ–नही. गवयिजी, आप बेफिकर रहना.

गवयी–सुनो. सरकार, मेरी और आपकी छोटेखानीसे दोस्ती थी.लेकिन आप अबी बडा हुवा सो ये बंदेकु भुलगया. ऐही है.

गृहस्थ (विचारांत पडून)–गवयीजी, मेरेकु माफी करना. लेकिन मेरी और आपकी छोटेपनकी दोस्ती कैसी, ये समज नहीं आती. वास्ते मेहेरबानीसे ये बातका खुलासा करदेना.

गवयी–मेरे जीवजान दोस्तजी, आप और मै पांच बरसके आगाऊ जनार्दनपंत पंडतजीके पाठ शालेमे साथ पढतात. येही खुलासा लेकिन ख्यालमे नहीं आयगा तो और जादा खुलासा कह देऊं.

गृहस्थ–सच्ची बात. लेकिन जादा खुलासा बहोत अच्छा.

गवयी(आपल्या हातांतील मुद्रिका दाखवून)–मेरे प्यारे दोस्तजी, और निदानिका खुलासा येइ है; लेकिन इत्ती वखत सरकारनें बंदेकु पिछाना नहीं यें बहोत आजबकी बात है.

गृहस्थ(विचारांत पडून मनांत)–ही मुद्रिका

आहे खरी परंतु ती मी माझी प्राणप्रिया कमळिणी हिजला प्रीति पूर्वक अदला-बदलींत बक्षीस दिली होती. असें असतां ती ह्या परक्या पुरुषाजवळ कशी आली असावी बरें, परंतु ह्याचा चेहरा तर अगदीं माझे प्रियेसारखा-च दिसत आहे. तस्मात् ही माझी प्रिया कमळिणी तर हे बनावट गवयाचें रूप धारण करून आली नसेल ना? कांहीं असो. ही कमळिणीच असावी ह्यांत संशय नाहीं. एक वेळ हाक तर मारून पहावी, असें मनांत ह्मणून हाक मारण्याच्या उद्देशानें त्या गवयाकडे तो गृहस्थ पाहूं लागला. इतक्यांत पुनः पूर्ववत विचारांत पडून मनांत ह्मणाला. परंतु अरे वसंतभानु, तुझा विचार खरा न ठरल्यास तुझी फजिती होऊन तुझे मनांत असलेली गुह्य गोष्ट ह्या तिसऱ्या मनुष्यास कळेल. तस्मात् गप्प बसणें बरें. अशा पुष्कळ रीतीनें त्यानें आपल्या मनाची समजूत केली, परंतु शेवटीं त्याचें मन अनावर होऊन त्यानें त्या गवयाकडेस पुनः एक वेळ फारच बारकाईनें न्याहाळून पाहिलें तों ती कमळिणीच असावी, अशी त्याची पक्की खात्री होऊन त्यानें मोठें धैर्य करून त्या गवयास ह्मटलें कीं, मला वाटतें ही माझी प्रिया कमळिणाच असावी.

प्रिय वाचक हो, आतां हा बेलबागेंत सहल करीत आलेला गृहस्थ कोण व तो गवई कोण हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. तो तरुण गृहस्थ मागील भागांत सांगितलेला सावकार-पुत्र वसंतभानु होय. त्याच प्रमाणें गवयाचें बनावट रूप धारण करून आलेली ती स्त्री कमळिणीच होती. वसंतभानुचें व कमळिणीचें शाळेंत असतांनाच परस्पर प्रेम बसलें होतें. हें मागील भागाचे शेवटीं

सांगितलेंच आहे. त्यानंतर उभयतां शाळेंतून निघाल्याव त्यांची कधीं कधीं दृष्टि भेट होई. तथापि त्यांची सम भेट झाली नव्हती. ह्मणून तिनें ही युक्ति शोधून कोणा ओळखतां न येतां एकांतीं भेट घेण्याचा यत्न केला व तं सफलही झाला. असो. आपणास वसंतभानुनें ओळख असें पाहून कमळिणीनें हास्यवदन करून वसंतभानू मोठ्या प्रेमानें घट्ट आलिंगन केलें. नंतर त्यां तिस आपणाशेजारीं बसवून खालीं लिहिल्याप्रमा निजबरोबर संभाषण करण्यास सुरवात केली.

वसंतभानु—प्रिये, आज तुझी भेट झाल्यानें मला प आनंद झाला आहे; परंतु हें बनावट रूप धारण रण्याचें व इतके श्रम घेण्याचें कारण कोणतें असावें बरें

कमळिणी—प्राणप्रिया, आपणांस उघड रीतीनें एकां भेटतां यावें ह्मणून.

वसंतभानु—प्रिये, आज भेटीचें इतकें जरूरीचें क कोणतें तें तर कळूं दे?

कमळिणी—प्राणप्रिया, आपण शाळेंत असतां दिले वचन विसरलांत कीं काय, ह्याची खातरी करणें हेंच हो

वसंतभानु—प्रिये, दिलेल्या वचनास हा वसंतभानु व धींही फिरावयाचा नाहीं. तूं निर्धास्त ऐस.

कमळिणी—प्रिया, त्याजविषयीं माझे मनाची खा होतीच. परंतु शाळा मोडल्यास आज सुमारें पांच भरत आलीं असें असतां ह्या दासीची एक वेळ आठ तर खरी? बरोबरच कशास व्हावी, मी आपले स्वरू व विद्वत्तेच्या मानानें आपली दासी तरी शोभतें काय

वसंतभानु—प्रिये, तसें नव्हे. परंतु त्याचे उलट ह्मटलें असतां मला वाटतें कदाचित् चालेल.

कमलिणी—प्रिया, मला जळलं उलटसुलट बोलतां येत नाहीं, ह्मणून माझी थट्टा चालविली आहे ना? बरं बाई असो. किती केलं तरी मी आपली दासीच आहे. मग थट्टा केलीत ह्यांत नवल तें कोणतं?

वसंतभानु—प्रिये, पण त्वां इतका गायनकलेचा अभ्यास उत्तम रीतीनें केव्हां साधलास बरें?

कमलिणी—प्राणप्रिया, मी शाळा सोडल्यानंतर कांहीं दिवसांनीं आळसानं कामाशिवाय बसणं हें मला न आवडून, मीं बाबांस माझा गायनविद्या शिकण्याचा हेतु प्रदर्शित केला. त्यास त्यांनीं रुकार देऊन मला गायन शिकवायास एक हुशार हिंदुस्थानी गवयी ठेविला. त्याजजवळ सुमारें दोन वर्षें पर्यंत मीं ह्या विद्येचा अभ्यास करीत होतें, तेव्हांपासून मला ही विद्या थोडी थोडी अवगत आहे.

वसंतभानु—प्रिये, शाबास तुझ्या उद्योगीपणाची. निरुद्योगी बसणें हें मनुष्यमात्रास योग्य नाहीं.

कमलिणी—प्रिया, तें असो. पण आतां ह्या दासीनं आपणां करितां आणखी किती वर्षें तरी झुरत रहाव बर? प्राणप्रिया. खरंच सांगतें. आतां आपल्या भेटीवांचून जो जो दिवस जात आहे, तो केवळ वर्षाप्रमाणें भासत आहे. तस्मात् कसंही करून एकदां लवकरच ह्या दासीचं पाणीग्रहण करून हीस सुखी करा. नाहींपेक्षां ही आपली दासी झुरणास लागून लवकरच स्वर्गवासी होईल ह्यांत संशय नाहीं.

वसंतभानु (कमळिणीचें मुख कुरवाळून)—प्रिये, हे का वेडीप्रमाणें एखादें भलतेंच ? तूं त्याजविषयीं काडीमा‍ चिंता करूं नकोस. थोडक्याच महिन्यांत आपला मानसिक झालेला विवाह सर्व जनांसमोर होईल.

कमळिणी—प्रिया, पण ही गोष्ट फक्त आपणां दोघांचेच मनांत असून तिचा उपयोग काय ?

वसंतभानु—प्रिये, आतां सर्वच मी तुजला सांगावें असें नाहीं. तूं सूज्ञच आहेस. तस्मात् ह्यास कांहीं तरी युक्ति काढून ही गोष्ट तुझे पित्याचे कानावर जाऊन, तुझी तसवीर मजकडेस येईल अशी तजवीज त्वां करावी. मग बाकी राहिलेलें सर्व काम मी युक्तिनें पसार पाडितों.

कमळिणी—प्रिया, ठीक आहे. मी हरयुक्ति करून आपण सांगितल्याप्रमाणं करवितें.

वसंतभानु (भितीनें आजुबाजूस पाहून)—पण प्रिये, आपल्या ह्या गोष्टी कोणी ऐकिल्या तर नसतील ना ? कारण अशा वेळीं झाडांस व भिंतीसही कान फुटतात.

कमळिणी (भयभीत होऊन)—प्रिया, पण आपले आजुबाजूस कोणीही नाहीं. ह्मणून भिण्याचं कारण नाहीं.

वसंतभानु—प्रिये, पण मला वाटतें आपण बोलतां बोलतां अंधार पडून रात्र बरीच झाली असावी. चंद्रमा किती वर आला पहा, कदाचित् महालांत तुजबद्दल शोधाशोध होऊन भलतेंच अरिष्ट उभें राहील.

कमळिणी—खरंच प्रिया. तस्मात् आतां येथून लवकरच निघून जावं हे बरं.

वसंतभानु—पण प्रिये, आतां पुन्हा ह्या मनोरम स्वरूपाची भेट केव्हां बरें होईल ?

कमळिणी–प्रियकरा, भानूदय झाल्याशिवाय ह्या कमळिणीस संजीवनच नाहीं. ह्मस्तव परस्परांची भेट नेहमीं झालीच पाहिजे.

वसंतभानु–प्रिये, आतां आपण सारी रात्र जरी इक्कडेस काढिली तरी आपला हा प्रेमसंवाद पुरा होणें नाहीं. तस्मात् इतःपर बोलणें न वाढवितां आपापले ठिकाणीं निघून जाणें हें प्रशस्त आहे.

कमळिणी (उठून जांभयी देऊन)–अग आई आई ग, प्राणप्रिया, कधींही विशेष श्रम करण्याची सवई नसल्याकारणानं केलेल्या श्रमामुळं सर्वांग किती ठणकत आहे; असो मेलं. केलेले श्रम निफल न होतां आपली भेट झाली हा मोठाच त्यापासून लाभ झाला ह्मटलं पाहिजे पण प्रिया, आपलीं मातापितरें भोजनास आपली वाट पहात असतील. सबब आतां उशीर न करितां आपापले ठिकाणीं निघून जाणं हा उत्तम पक्ष.

वसंतभानु–येतों तर. प्रिये, प्रेमयुक्त लोभ असावा बरें !

कमळिणी–प्राणप्रिया, उभयपक्षीं तसाच असला पाहिजे.

प्रिय वाचक हो, ह्या प्रमाणें त्या उभयतांचें त्या बेलबागेंत संभाषण होऊन तीं एकमेकांची रजा घेऊन अत्यंत दिलगीर होत्सातीं एकमेकांपासून निराळीं होऊन आपापल्या घरीं गमन करितीं झालीं.

भाग चवथा.

कमळिणी व वसंतभानु हीं उभयतां लहानपणीं एकाच शाळेंत विद्याभ्यास करीत होतीं, हें माझे प्रिय वाचकांनीं

दुसऱ्या भागांत वाचलेलें त्यांस आठवत असेलच. नंतर कमळिणी हिनें वाचन, लेखन, गणीत इ० स्त्रियांस अवश्य तेवढी विद्या संपादन करून आपले वयाचे अकरावे वर्षी शाळा सोडली. शाळा सोडल्यानंतर तिचे आईबापांनी तिस घरींच तिच्या मनाच्या कलावरून गायनकलेचा अभ्यास करविला. प्रिय वाचक हो, कमळिणी हिचे आई-बापांस आपत्य ह्मणून काय तें एकटी कमळिणीच होती. ह्मणून ती त्यांस फार प्रिय असे. ते तिचे फार लाड करीत असत.

कमळिणीचे बापाची शहराबाहेर एक बाग होती, व तींत एक सुंदर लहानसा वाडा होता. कमळिणी हीस ती जागा फार रमणीय वाटत असे ह्मणून बहुधा ती त्याच वाड्यांत आपले सख्यांसह रहात असे. पुढें तिस सोळावें वर्ष लागून ती वयांत आल्यावर सृष्टिनियमानुसार तारुण्यदशेंत उत्पन्न होणारी सुखोपभोगेच्छा व सुखवस्तूंची आवड हीं कमळिणीच्याठायीं वसूं लागलीं. कमळिणीस वाटूं लागलें कीं, मनुष्यमात्राचें आयुष्य क्षणभंगूर आहे. जेवढें सुख भोगण्यास मिळेल तितकें मात्र पदरांत पडलें असें समजावें; व त्यांत आनंद मानावा हें योग्य आहे. ही कनकरूप सुंदर काया ज्या कोणी भाग्यशालीकरितां विधात्यानें उत्पन्न केली आहे, त्यास अर्पण करून त्याचे सेवेंत तत्पर राहून आयुष्याचे दिवस सुखानें घालवावे, हा विचार पुष्कळ दिवस तिचे मनांत घोळत होता. परंतु तो प्रगट करण्याचें धैर्य तिला होईना. कोणासही ती ह्या बद्दल बाह्यात्कारी चिन्ह दाखवित नसे.

पुढें तिचा मनोविकार तिस दिवसेंदिवस विशेष

पीडा करूं लागला, व ती मनांत वागत असले-ल्या गोष्टीचे काळजीनें दिवसानुदिवस झुरत जाऊन तिचें रूप, स्वभाव, व वृत्ति अगदीं पालटत चा-लली. सारांश तिला मदनविकार उत्पन्न होऊन तिचें भान चंचल झालें, व तिस कोणतीही गोष्ट आवडेनाशी झाली. सकाळच्या प्रहरीं मंजूळ असा कोकीळपक्षाचा शब्द जो मनोरम ह्मणून ती नेहमीं चित्त देऊन ऐकत असे तो सापाच्या रागाच्या फुपाऱ्यांप्रमाणें तिस तीक्ष्ण भासूं लागला. व सायं-कालचा मंद शीतल वायु तिस प्रखर वाटूं लागला. जे फुलांचे हार ती मोठ्या प्रीतीनें नेहमीं ग्रहण करीत असे ते मदनाचे शरच आहेत कीं काय असें तिस वाटूं लागले, व त्यांचा ती तिरस्कार करूं लागली. पौर्णि-मेचा आल्हादकारक चंद्रमा तिस मदनदर्पणाप्रमाणें भासूं लागला. तिचे सख्यानीं तिस कर्मणुकीचे खेळ खेळावयास आग्रह केल्यास तिला तें न आवडून तिनें एकांतीं वि-चारांत बसावें. दासींनीं मिष्टान्न भोजनाचें ताट आणलें असतां तिची क्षुधा नाहींशी व्हावी, व आपले सख्यां-चे अत्याग्रहामुळें तिनें थोडेसें अन्न मात्र भ-क्षण करावें. उंचीं नेहमींचीं आवडीचीं वस्त्रें भूपणें तिस आवडत नाहींशीं झालीं. त्या रमणीय वाड्याचा व पदरींच्या दासी, सख्या, ह्यांचा तिस अतीशय कंटाळा येऊन आपण कोठें तरी वनांत प्रवेश करून तिकडेस एकटेंच रहावें, असें तिस वाटूं लागलें. सारांश. ती अगदीं उदासीन दिसूं लागली.

ह्या प्रमाणें तिची चंचळ व भानरहित स्थिति पाहून तिच्या सख्या व दासी अगदीं भिऊन गे-

त्यां, व तिस कोणता उपाय करावा हें त्यांस सुचेनासें झालें. त्या सर्वांत सावित्री ह्मणून कमळिणीची एक अत्यंत प्रियकर मैत्रीण असे, तिला तर सर्वांपेक्षां अत्यंत वाईट वाटून तिनें एके दिवशीं कमळिणीस एकांतीं बोलावून तिची एकाएकीं अशी स्थिति होण्याचें कारण विचारलें. कमळिणी स्वभावत: मोठी भिडस्त होती ह्मणून ती गोष्ट सांगण्याविषयीं तिस हिया होईना; व ती प्रथम टाळाटाळ करूं लागली. परंतु न जाणो कदाचित् सावित्री आपल्या रोगास कांहीं उपायाची योजना करील अथवा युक्ति सुचवील अशा भरंवशानें व सावित्रीच्याही अत्याग्रहास्तव तिनें आपल्या मनांत घोळत असलेली गोष्ट मोठ्या सावधपणानें वरून वरून तिस सांगितली. सावित्री ही जात्या मोठी धूर्त होती. तिनें तितक्यावरून लगेच कमळिणीस कामदेवाची पीडा झाली असावी असा तर्क केला. व कांहीं विशेष माहिती मिळावी ह्मणून खालीं लिहिल्याप्रमाणें ती कमळिणीस विचारूं लागली.

सावित्री—बाई कमळिणी, आतां त्वां सांगितलेल्या हकिकतीवरून तुझ्या रोगाची तर बाई परीक्षा झालीसं वाटतं. पण आणखी एक गोष्ट अजून तुला विचारावयाची राहिली आहे. विचारल्यास राग तर नाहींना येणार ?

कमळिणी—त्यांत राग ग कसचा बाई ? आणि राग तो करावयाचा तरी कोणाबरोबर ?

सावित्री—बरं तर. प्रियकर कमळिणी, मला खातरीनं वाटतं कीं तुला कामदेवाची बाधा झाली आहे. तर त्वां मनापासून आपलं प्रितिपात्र कोणास योजिलं आहेस ? खरंच सांग

काय तें. ह्मणजे त्याच पंचाक्षऱ्यास पाहून त्राधेची झाडणी करण्याचा प्रयत्न करण्यास ठीक पडेल.

कमळिणी–(किंचित् स्मित व लज्जित वदन करून) हें ग काय जळलं विचारणं? मी बाई नाहीं ह्यांत कांहीं समजत.

सावित्री–प्रियकरे, ह्यांत लाजण्या–सारखं आहे तरी काय? ही दुनियाची रीतच आहे. गंगेचा ओघ सागराकडेस असायाचाच. मग त्वां तसं केलं ह्यांत नवल तें कोणतं?

कमळिणी–सखे, तूं तरी बाई जबरीच चाणाक्ष आहेस. एखादी गोष्ट एखाद्याच्या आंगीं लावून त्याजजवळून ती काढून घेणं ह्याजविषयीं तुझे युक्तयांपुढें सिमा आहे.

सावित्री–प्रियकरे, आंगीं लावायाचं असं कां बरं ह्मणतेस? हें खरं किंवा खोटं ह्याजविषयीं तुझं मनच तुला साक्ष देत असेल. फार कशाला? लबाडी बोलत असेल त्याचे डोक्यास कापूस लागला आहे. पहा बरं आहे किंवा नाहीं तो?

कमळिणी–(मनाची ओशाळी असल्या कारणानें डोक्यास हात लावून) कोठें ग आहे तो, आतां तरी खरं पटलं ना?

सावित्री–खरंच बाई. मनाचं ओशाळं असल्याशिवाय का कोणी डोक्यास हात लावितं, आतां मी ह्मणतें तसं खरंच. त्यांत काडीमात्र शंका राहिली नाहीं.

कमळिणी–मी बाई भोळपणानं उगाच हात लाविला. परंतु तेवढ्यावरून त्वां त्यांत लागलीच मसलतीची कल्पना लढवून माझी थट्टा करावीसना? तुला तर बाई थट्टेवांचून कांहीं सुचतच नाहीं.

सावित्री–प्रियसखे, बोलतां बोलतां एखादी गोष्ट आ-

काशपंथें उडवून नेण्यांत तूं मोठी प्रवीण आहेस, हें मी जाणत हों ?

कमलिणी—प्रिये सावित्री, मी आजपर्यंत तुजसमोर लपविलेली अशी एक तरी गोष्ट असेल का ? असं असतां ही गोष्ट तुजसमोर लपवून ठेवण्याचं कारण नव्हतं. परंतु मला मेली ही गोष्ट सांगायास फारच लाज वाटते.

सावित्री—पण लाज वाटण्यास इकडेस आपणा दोघीं शिवाय तिसरं का कुणी आहे ?

कमलिणी—(हास्यवदन करून) बरं तर बाई. सांगतें· परंतु त्याजवर एखादी युक्ति काढणं एकिकडेस ठेवून तूं माझी नेहमीं थट्टा करिशिल तर ?

सावित्री—(हांसत) बरोबरच. मेलं एकवेळ माणूस लबाड ठरलं कीं त्याचा विश्वास पुन्हा कोण करणार ?

कमलिणी—बरं बाई. अमळ विनोदानं बोलले, त्याचा राग का आणावयाचा ? मला मनांतील दुःखाची गोष्ट सांगावयास मेलं जिवलग दुसरं आहे तरी कोण ?

सावित्री—असं खरं ना ? मग सांग पाहूं एकदां त्या भाग्यशाली पुरूषाचं नांव ? कीं जो माझ्या सुकुमार मैत्रिणीचें प्रीतिपात्र होऊन त्यानें तिस वेडावून टाकलें.

कमलिणी—बरं तर बाई. सांगतें श्रवण कर. अग, आपण शाळेंत जात होतों, तेव्हां तेथें वसंतभानुनामक सावकारपुत्र शिकावयास येत होते, त्यांस ओळखतेस ना ? त्यांजकारितांच हा जीव इतका झुरणीस लागला आहे. आतां तर झालं ना बाई ?

सावित्री—पुरे पुरे बाई. आतां समजलें मी. परंतु खरंच

सांग एकदां, शाळेंत असतांनाच तुमचें एकमेकावर प्रेम जडलें होतें कीं मागाहून ?

कमळिणी—पुरे झाल बाई. परंतु आतां ह्याजविषयीं खोदून खोदून विचारून दिवसांतून किती वेळां थट्टा करिशील ?

सावित्री—(हास्य वदन करून) प्रियसखे, असं कदापि होणार नाहीं. तूं नेहमीं दिलगीर असल्यानं माझा निय तीळतीळ जीव तुटत आहे. असं असतां तुझ्या दुःखित झालेल्या कोमळ हृदयास थट्टारूप डाग देणं हें मला शोभतं तरी का ? प्रिये, तूं स्वस्थ ऐस. ज्या प्राण्याकरितां तू शोकसागरांत बुडाली आहेस, त्याचा व तुझा भेटरूप संगम मी हर युक्तीन करवितें. मग तर झालं ना ?

कमळिणी—बाई, तुझे तोंडांत साखर पडो. परंतु आपले महालांत पुरुषमात्रास येण्यास सक्त मनाई आहे. मग आपली मनकामना सिद्ध होणार कशी ?

सावित्री—प्रियकरे, त्याजविषयीं तूं काळजी करूं नकेस. पहा, तुझें प्रितिपात्र वसंतभानु नेहमा सायंकाळीं बेल ळबागेंत हवा खाण्यास जात असतो हें मला माहीत आहे. तिकडेस त्वां जाऊन त्यांस एकांतीं गांठ घेऊन भेटावं ह्मणजे झालं.

कमळिणी—प्रिये, असं कसं करतां येईल ? मला ध्या-ड्याचे बाहेर तरी जाण्यास मोकळिक आहे का ?

सावित्री—प्रिय-सखे, त्याजविषयीं तूं निर्धास्त रहा. त्यास मला एक उत्तम युक्ति सुचली आहे. पहा, आपले महालांतून एक भुयार आहे, तें शहराच्या तटाच्या आंतल्या बाजूस पार निघतं त्या वाटेनं त्वां बेलबागेंत जावं ह्मणजे

वाड्यांत कोणासही न समजतां तुला तुझे प्राणप्रियाची भेट घेतां येईल.

कमळिणी–हें खरं. परंतु वेलबागेत त्यांजप्रमाणं शेकडों लोक नित्य हवा खाण्यास येणारे असे असतील; व त्याच-प्रमाणं लक्ष्मीकांताचे दर्शनास पुष्कळ लोक नेहमीं येत जात असतातच. तस्मात् तिकडेस जाणं कसं शोभतं? व्यर्थ फजिती मात्र होणार.

सावित्री–अग, तसं नव्हे. लोक ओळखतील अशा रोजच्या का पोशाखानं तिथं जायचं? तुला सांगतें ऐक. तुला गाणं चांगलं येत आहे. ह्याजकारितां त्वां हिंदुस्थानी गवयाचा उत्तम पोशाख करून जावं. ह्मणजे तुला कोण ओळखणार? आणखी तुझे प्रिय वसंतभानूस गाण्याचा नाद फार आहे, ह्यामुळें तेथें त्वां उत्तम गायन केलं असतां तें ऐकावयास तो सहजच येईल; ह्यांत संशय नाहीं. मग तूं त्यास एकांतीं भेटण्याचा नेत्रसंकेत कर ह्मणजे झालं.

कमळिणी–प्रिये, सगळी गोष्ट खरी, परंतु इतकंही करून ओळख न पटली ह्मणजे? कारण, आज शाळेंतल्या ओळखीस व प्रेमास पांच वर्षें झालीं; तव्हां कदाचित् को-णजाणे तिकडलं प्रेमही बदललं नसेल कशावरून?

सावित्री–तें खरंच बाई. आज शाळा सोडून आपणा-स सुमारं पांच वर्षें भरत आलीं. पण प्रिये कमळिणी, तूं सांगतेस कीं लहानपणापासून तुमची एकमेकांवर प्रीति होती; त्या अर्थीं त्या वेळची कांहीं तरी खूण त्यांस सांगावी ह्मणजे झालं. तुला तर बाई सर्वच सांगावयास पाहिजे.

कमळिणी–(आठवण केल्यासारखें करून) हो हो, सखे, मजजवळ त्यांनीं शाळेंत असतां मला प्रीतिपूर्वक

बक्षीस दिलेली एक हिरेजाडित आंगुठी आहे. ती दाखवीन ह्मणजे झालं .

सावित्री—वाहवा. ठीक आहे. ही उत्तम युक्ति. उद-यीक जाऊन एकदां फत्ते करून ये, ह्मणजे झालं बाई.

कमळिणी—प्रिये, तथास्तू. परंतु गुप्तद्वारानें बाहेर गेल्यावर मी महालांत नाहींसं पाहून माझे पश्चात इकडील सर्व मनुष्यें माझे शोधास लागून सर्व गोंधळ करितील. त्यास काय युक्ति ?

सावित्री—जळो बाई. अझून तुझं मेलं परंतु सुटत ना-हींना ? अग, उदयीक तूं फार आजारी आहेस असं ढोंग घे; व मजशिवाय इतर कोणी महालांत येऊं नये अशी पद-रच्या सर्व माणसांस सक्त ताकीद दे. ह्मणजे झालं. मग तूं जाऊन येईस तों पर्यंत मी आंतले बाजुनं महालाचा दरवाजा बंद करून तुझी वाट पहात बसतें.

कमळिणी—ठीक ठीक. बाई सावित्री, शाबास तुझी. तुझे हे उपकार मी मरेपर्यंत विसरणार नाहीं.

प्रिय वाचक हो, 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः' असें ग्रथांतरीं ह्मटलें आहे, त्याचा हा एक उत्तम मासला आहे. असो. नंतर दुसरा दिवस उजाडतो केव्हां असें कमळिणीस झालें. मग संकेताप्रमाणें सावित्री व कमळिणी यांहीं दुसरे दिवशीं बेतबात रचून कमळिणी त्या गुप्त भुयारावाटे बाहेर पडून पहिल्या भागांत लिहिल्याप्रमाणें बेलबागेंत वसंतभानूची भेट घेऊन त्याच वाटेनें परत आपल्या महालांत आली. तों सावित्री तिची मार्गप्रतिक्षा करीत बसली होतीच.

सावित्री–(कमळिणी आलीसें पाहून) कसं काय बाई, युक्ति सफल झाली ना ?

कमळिणी–प्रियसखे, तुजसारख्यांची मदत असतां युक्ति सफल होऊन कामांत यश कां बरं नसवं ? (असें ह्मणून आपला बनावट पोशाख उतरून नेहमींचा पोशाख धारण-करून सावित्रीजवळ बसते.)

सावित्री–पण प्रिये, त्वां आपले प्रियकराबरोबर काय काय भाषण केलं तें तर समजूं दे.

कमळिणी–पण आतां तें ग कशास विचारावयास हवं? तुला मेली सगळेच गोष्टींची चौकशी. असं भोळेपणानं विचारून मग आपली माझी थट्टा करायाची ना !

सावित्री–बरोबरच आहे."गरज सरो व वैद्य मरो"अशी ह्मण आहे ती कांहीं खोटी नाहीं. बरं तर बाई. नको सांगूं. पण इतःपर ह्या कामासंबंधीं जशी विचारण्याची तशी कोणतीही मदत करण्याचीही मला जरुर नाहीं. हें खरं ना ?

कमळिणी–प्रिये, तुला राग कां आला ? तुजपुढें एखादी गोष्ट लपवावी असं माझे मनांत मुळींच नाहीं. परंतु मला बाई लाज वाटते सांगायास. ह्मणून उगाच तसं ह्मटलं. प्रिये, ऐन सुखसागराचे मध्यभागीं आणून माझं तारूं बुडवितेस ना ? बरं असो. त्या परमेश्वराची मर्जी. (असें ह्मणून रडूं लागते.)

सावित्री–(तिचे डोळे पुसून) प्रिये, तुझं मन अगदीं कोमळ आहे बाई. उगाच थट्टेनं बोलले ह्मणून मी तसं करीन असं तुला वाटतं का ? माझा स्वभाव तुला माहीत नाहीं वाटतं.

